

डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जींचा त्याग राष्ट्रनिर्माणासाठी प्रेरणादायी

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 24/06/2025 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 139 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# प्रत्येक रुपया सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला पाहिजे - उपमुख्यमंत्री शिंदे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई : विकासासाठी खर्च केला जाणारा प्रत्येक रुपया सर्वसामान्यांपर्यंत पोहचला पाहिजे आणि त्यादृष्टीने संसदेच्या प्राक्कलन समितीचे ( अंदाज समिती) काम खूप परिणामकारक ठरते, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. संसद तसेच विविध राज्यांच्या प्राक्कलन समितीच्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

उपमुख्यमंत्री आपल्या भाषणात म्हणाले की, गरीब कल्याण हा पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचा अजेंडा असून प्रत्येक रुपया हा गरिबांपर्यंत पोहचलाच पाहिजे, हे त्यांचे नेहमी सांगणे असते. अंदाज समित्या या दृष्टिकोनातून महत्वाची भूमिका बजावत असतात तसेच प्रशासनाची कार्यक्षमता, अर्थकारण आणि पारदर्शकता सुनिश्चित करतात. सध्या या समित्यांचा अमृतकाल असून देशाचीही प्रगती दुप्पट गतीने होत आहे. संसदीय समित्या म्हणजे छोटी संसद किंवा छोटी विधिमंडळे असतात.या समित्या म्हणजे लोकशाहीच्या आत्म्याचा आरसा आहेत असे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, लोकशाही व्यवस्थेत आर्थिक जबाबदारी आणि पारदर्शकता हे अत्यंत महत्त्वाचे आधारस्तंभ असून अंदाज समिती हे एक अत्यंत सक्षम आणि प्रभावी संसदीय माध्यम आहे, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

आपल्या अंदाजपत्रकात अनेक गोष्टी असतात. घोषणा आणि तरतुदीही असतात. या तरतुदींचा योग्य, ठरावीक वेळेत आणि प्रभावी वापर होतोय की नाही, हे पाहणे महत्त्वाचे ठरते, आणि हीच जबाबदारी ही समिती पार पाडते असे सांगून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी लाडकी बहीण योजनेचा उल्लेख केला.

ते म्हणाले की, जेव्हा मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री झालो,तेव्हा विकासासोबत अनेक कल्याणकारी योजना राबवल्या.त्यातील एक म्हणजे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना'. लाडकी बहीण योजना सुरू करण्याआधी आम्ही आरबीआयच्या सर्व मार्गदर्शक तत्वांचा, अंदाजपत्रकातील तरतुदींचा, एफआरबीएम कायद्याचा पूर्ण विचार करून हे पाऊल उचलले.

जनतेच्या व्यापक हितासाठी अशा योजना अत्यावश्यक असतात, असे एकनाथ शिंदे यांनी नमूद केले.

# एमपीएससी परीक्षार्थ्यांसाठी 'केवायसी' प्रक्रिया बंधनकारक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीत कोणताही अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांना 'केवायसी' प्रक्रिया पूर्ण करणे सक्तीचे करण्यात आले आहे, अशी माहिती एमपीएससीने दिली आहे.एमपीएससीने दिलेल्या माहितीनुसार, उमेदवारांना पुढील चारपैकी कोणत्याही एका पद्धतीने ओळख पडताळणी (केवायसी) करावी लागणार आहे:

- आधार ऑनलाईन ई-केवायसी,- आधार ऑफलाईन पेपरलेस डिजिटल केवायसी,- आधार ऑफलाइन पेपर आधारित केवायसी,नॉन-आधार ऑफलाइन केवायसी या चार पद्धतीने ओळख पडताळणी (केवायसी) करता येणार आहे.

अर्ज करण्याआधीच ही केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक असेल. याशिवाय, एकदाच नोंदणी करताना उमेदवाराने आपला मोबाईल नंबर आणि ई-मेल आयडी प्रणालीत नोंदवणेही आवश्यक आहे. जर उमेदवाराने आधार आधारित पडताळणी निवडली, तर आधार क्रमांकाशी संलग्न मोबाईल नंबर असणे आवश्यक आहे. संदर्भाने, एमपीएससीने मार्च 2017 पासून ऑनलाईन प्रणालीत आधार क्रमांक नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली होती.

ही प्रणाली लागू केल्यामुळे उमेदवारांची ओळख अचूकरीत्या प्रमाणिकरण करता येणार असून, फसवणूक आणि चुकीच्या माहितीला आळा बसेल. विशेष म्हणजे, विशिष्ट ओळख प्राधिकरण आणि राज्य शासनाने एमपीएससीला अधिकृत मान्यता दिली असून, आता भरती प्रक्रिया आणि स्पर्धा परीक्षा यांच्या विविध टप्प्यांवर आधार प्रमाणीकरण वापरता येणार आहे.

# खान्देश कानबाई माता उत्सवाच्या यशस्वीतेसाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

'खान्देश सार्वजनिक कानबाई माता उत्सव २०२५' करीता प्रमुख संयोजक म्हणून माजी सत्तारुढ पक्षनेता नामदेव ढाके यांच्या नावाची एकमताने घोषणा करण्यात आली. रविवारी सायंकाळी खान्देश मराठा मंडळाच्या सभागृहात 'खान्देश सार्वजनिक कानबाई माता उत्सव २०२५' ची बैठक यशस्वीरित्या पार पडली. या बैठकीला खान्देशातील विविध समाज प्रतिनिधी आणि खान्देश मराठा मंडळाचे संचालक उपस्थित होते. उत्सवाच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा होऊन काही महत्त्वाचे निर्णय बैठकीत घेण्यात आले.



खान्देश मराठा मंडळाचे अध्यक्ष ॲड. हेमंत चव्हाण यांनी सभेचे प्रयोजन स्पष्ट केले. तसेच, उपस्थित सर्व सदस्यांना चर्चेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. यावेळी, नामदेवराव ढाके, ॲड. हेमंत चव्हाण, शंकर पाटील, दिनेश निकम, अविनाश अहिरे, युवराज अहिरे, कोमलसिंग राजपूत, शिवाजी पाटील, देविदास पाटील, पंकज निकम, रविंद्र माळी, लिलाधर मगरे, रविंद्र पाटील, सचिन महाले, सुनील मराठे, राजेंद्र देसले, जितेंद्र पाटील, अनिल सावंत, किशोर पाटील, मनोहर पाटील, जितेंद्र पाटील, प्रदीप शिंदे, प्रदीप शिरसाठ, रविंद्र फुलपगारे, विलास महाजन, हेमंत पाटील, भगवान निकम, प्रदीप पटेल, सोयम अस्वार यांसह खान्देशातील सर्व समाजाचे प्रमुख व मान्यवर उपस्थित होते.

या बैठकीत नामदेवराव ढाके यांनी उत्सवाचे सर्व खर्च करण्याची तयारी दर्शवली. त्यांच्या या भूमिकेचे सभेने कौतुक करत एकमताने नामदेवराव ढाके हे 'खान्देश सार्वजनिक कानबाई माता उत्सवा'चे प्रमुख संयोजक असतील. त्यांच्या या नेतृत्वाखाली उत्सव यशस्वी होईल, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला. उत्सवाशी संबंधित सर्व आर्थिक निर्णय आणि जबाबदारी आता नामदेव ढाके यांच्याकडे असेल. खान्देश मराठा मंडळाचे प्रतिनिधी म्हणून अनिल सावंत निरीक्षक म्हणून सहकार्य करतील.

या बैठकीत सामाजिक भान जपून 'कानबाई उत्सव समिती'ने सर्व समाज प्रतिनिधी, सामाजिक मंडळ सदस्य आणि महिला सदस्यांना समितीमध्ये समाविष्ट करून खान्देशी संस्कृतीचे मानाचे स्थान अबाधित राखण्यासाठी एकदिलाने कार्य करण्याचा संकल्प केला. पुढील काळात एकत्र किंवा कोपरा बैठका घेऊन कार्यक्रमाचे नियोजन केले जाईल असे सर्वानुमते ठरले. उत्सवाशी संबंधित नियोजन, आवश्यक परवाने, कलाकार आणि इतर व्यवस्थापकीय बाबींवर सकारात्मक चर्चा झाली. सर्वांनी कानबाई माता उत्सव ठरल्याप्रमाणे यशस्वी करण्यासाठी योग्य ते योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले. बैठक अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून, आगामी कानबाई माता उत्सवाच्या यशस्वीतेसाठी सर्वजण एकदिलाने काम करण्यास कटिबद्ध आहेत.

# डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जींचा त्याग राष्ट्रनिर्माणासाठी प्रेरणादायी - प्रकाश क्षीरसागर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड : डॉ. मुखर्जींनी देशाच्या एकात्मतेसाठी केलेला संघर्ष आणि दिलेले बलिदान हे राष्ट्रनिष्ठेचे सर्वोच्च प्रतीक आहे. 'एक देश, एक विधान, एक निशान व एक प्रधान' या त्यांच्या घोषणेने तत्कालीन परिस्थितीत देशाची एकता टिकवण्यासाठी महत्त्वाचे कार्य केले, जे आजही राष्ट्रनिर्माणासाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रकाश श्रीरसागर यांनी केले.



जनसंघाचे संस्थापक, महान देशभक्त डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या बलिदान दिनानिमित्त भाजपतर्फे डॉ. मुखर्जींच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या अतुलनीय योगदानाला आदराने स्मरण करण्यात आले. मोरवाडी, पिंपरी येथील भाजपा कार्यालयात उपस्थित मान्यवरांनी डॉ. मुखर्जींच्या विचारांना आणि त्यांच्या राष्ट्रभक्तीला नमन केले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी, डॉ. मुखर्जी यांच्या देशकार्यावरील माहितीपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रकाश क्षीरसागर यांनी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जीवनातील महत्त्वाचे टप्पे, त्यांचे शिक्षण, कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून केलेले कार्य, स्वातंत्र्योत्तर काळात केंद्रीय मंत्री म्हणून त्यांचे योगदान आणि जनसंघाची स्थापना यावर सविस्तर माहिती दिली. काश्मीरच्या एकात्मतेसाठी त्यांनी पुकारलेला संघर्ष आणि त्यासाठी दिलेले बलिदान हे त्यांच्या राष्ट्रनिष्ठेचे सर्वोच्च प्रतीक होते, असे यावेळी आवर्जून नमूद केले. 'एक देश, एक विधान, एक निशान' या त्यांच्या घोषणेने तत्कालीन परिस्थितीत देशाची एकता टिकवण्यासाठी कसे महत्त्वाचे कार्य केले, यावरही प्रकाश टाकण्यात आला.

कार्यक्रमाला भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, आमदार उमाताई खापरे, माजी खासदार अमर साबळे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी महापौर उषा ऊर्फ माई ढोरे, कार्यक्रमाचे संयोजक मोरेश्वर शेडगे, दक्षिण आघाडी प्रदेश अध्यक्ष राजेश पिंल्ले, माऊली थोरात, सरचिटणीस शितल ऊर्फ विजय शिंदे, अजय पाताडे, महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे, वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, माजी नगरसेविका माधुरी कुलकर्णी, योगिता नागरगोजे, मनोज तोरडमल, युवा मोर्चा प्रदेश सदस्य अजित कुलथे, वैशाली खाडये, अर्जुन ठाकरे, खंडूदेव कथोरे, देवदत्त लांडे, बिभीषण चौधरी, विठठल भोईर, कैलास सानप, मंडल अध्यक्ष मोहन राऊत, हर्षद नढे, गणेश ढोरे, धरम वाघमारे, मंगेश धाडगे, अनिता वाळुंजकर, रामदास कुटे, शिवराज लांडगे, अमोल डोळस, अजित बुर्डे, बबन कांबळे, गोरक्षनाथ झोळ, रवी देशपांडे, सीमा चव्हाण, मनोज ब्राम्हणकर, गणेश आर. ढाकणे, संतोष टोणगे, नेताजी शिंदे, दिनेश यादव, महेंद्र बाविस्कर, दिपक भंडारी, दत्ता झुळूक, दत्ता ढगे, सुनील लांडगे, संतोष तापकीर, दत्ता तापकीर, मनिषा शिंदे, रामदास काळजे, गणेश लंगोटे, अभिजीत बोरसे, सचिन राऊत, दीपक नागरगोजे, उदय गायकवाड, राजू मासूळकर, अमेय देशपांडे, संजय परळीकर आदी उपस्थित होते.

उपस्थितांनी डॉ. मुखर्जींच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन राष्ट्रनिर्माणासाठी योगदान देण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमामुळे नव्या पिढीला डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या देशसेवेची आणि त्यागाची माहिती मिळाली, असे मत अनेकांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मोरेश्वर शेडगे यांनी केले. सुत्रसंचालन अजय पाताडे यांनी तर आभार विजय फुगे यांनी मानले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 24/06/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# विष प्राशन करून 18 वर्षीय युवकाची आत्महत्या!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहरात एका अठरा वर्षीय युवकाने विष प्राशन करून आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. "मम्मी मी मोबाईल फोडून टाकतो, पुरावा राहणार नाही. मला मरायचं आहे, मी विष प्यायलो आहे.. मी लोकेशन पाठवलं, माझा मृतदेह घेऊन जा.." अशा आशयाची सुसाईड ऑडिओ आईला पाठवून एका अठरा वर्षीय युवकाने विष प्राशन करून आत्महत्या केली. संजय कुमार विनोद कुमार राजपूत असं आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे.



17 जून रोजी देहू रोड पोलीस ठाण्यात संजय कुमार बेपत्ता असल्याची तक्रार देण्यात आली होती. शनिवारी त्याचा मृतदेह घोराडेश्वर डोंगराच्या पायथ्याशी आढळून आला. मृतदेहाच्या जवळ विषारी औषधाची बाटली आढळली. संजय कुमारने विष प्राशन करून आत्महत्या केल्याचं पोलीस तपासात स्पष्ट झालंय, तसे शवविच्छेदन अहवालात म्हटलं आहे.संजय कुमार हा पिंपरी चिंचवड परिसरात आपल्या कुटुंबासह राहतो. त्याच्या पश्चात आई-वडील आणि दोन बहिणी असं त्यांचं कुटुंब आहे. आत्महत्यापूर्वी संजय कुमारने म्हंटल होत कि, "ज्या प्रमाणे इतर लोक मरतात तसा मी ही मरेल.....आणखी काही बोलायचं नाही...माझ्या आई- वडिलांना एवढंच सांगायचं आहे की, माझ्या बहिणींना कुणी त्रास देऊ नका. मला काही नकोय...,केवळ माझ्या बहिणीची चिंता आहे. याव्यतिरिक्त ह्या जगात कुणाची चिंता नाही.

दोन्ही बहिणींची चिंता आहे. त्यांना काही झालं नाही पाहिजे.

त्यांच पालनपोषण चांगल व्हायला हवं. सुशिक्षित होऊन पुढे गेल्या पाहिजेत. माझं आयुष्य आता काही कामाच नाही."

# शिक्षणतज्ञ डॉ श्यामा प्रसाद मुखर्जी यांना अभिवादन !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

भारतीय जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष व शिक्षणतज्ञ डॉ श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यासाठी मा. नगरसेवक सुरेश भोईर यांच्या कार्यालय चिंचवड येथे भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन श्रद्धेय डाॅ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेस हार घालून अभिवादन केले.



या वेळी मा नगरसेवक सुरेश भोईर भाजपा युवा मोर्चा प्रदेश सचिव अजित कुलथे,उपाद्यक्ष रवींद्र देशपांडे,सचिव मधुकर बच्चे रवींद्र प्रभुणे, पल्लवी पाठक,दीपाली कालापुरे,पंजाबराव मोंढे,सुरभी उमदी,वैशाली भागवत, चंद्रकांत भालके,शिवाजी राऊत,मंगलदास खैरनार,शिवाजी देशमुख,शैलेंद्र गावडे,मधुकर कुलकर्णी,शिवाजी गावडे,सीताराम सुबंध,सुभाष पंडित,सर्जेराव कोळी,विजय आराख,हरिभाऊ मोहिते, आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.शामाप्रसाद यांनी कलकत्ता विद्यापीठाचे बी. एल्. (१९२४) ही पदवी घेऊन इंग्लंडमध्ये कायद्याचा अभ्यास केला व ते बॅरिस्टर झाले (१९२७). लंडनहून परत आल्यावर त्यांनी वकिली सुरू केली. त्यांनी जम्मू व काश्मीरच्या संपूर्ण विलीनीकरणासाठी अभियान सुरू केले. या आंदोलनानिमित्त प्रत्यक्ष काश्मीरमध्ये जाऊन प्रचार करण्याचा त्यांनी निश्चय केला. जम्मू-काश्मीरचे तत्कालिन मुख्यमंत्री शेख अब्दुल्ला यांच्या शासनाने त्यांच्या राज्यप्रवेशावर बंदी घातली. बंदी मोडून जम्मू-काश्मीरमध्ये प्रवेश केल्यावर त्यांना अटक झाली. तुरुंगवासातच त्यांचा अंत झाला. या प्रश्नावर शेख अब्दुल्ला यांच्याविरुद्ध त्यावेळी बरेच काहूर माजले होते.

"एक देश मे दो प्रधान, दो विधान, दो निशान नही चलेंगे"

असा नारा देऊन भारताच्या अखंडतेसाठी लढा देणारे, भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांना पुण्यतिथी निमित्त आपण सर्वांनी विनम्र अभिवादन करणे आपले कर्तव्यच आहे असे भाजपा उपाध्यक्ष रवींद्र देशपांडे यांनी आपल्या मनोगतात भावना व्यक्त केल्या. या वेळी परिसरातील विविध मान्यवर व नागरिक यांनीही आपल्या वेळेनुसार येऊन डॉ.शामाप्रसाद पुष्प वाहून यांना अभिवादन केले.

# एस.बी.पाटील स्कूल मध्ये जपानी संस्कृती विषयावर संवाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : जपान मधील भौगिलिक परिस्थितीमुळे अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. भूकंप, अतिवृष्टी या नैसर्गिक आव्हानांचा सामना करत नैसर्गिक आव्हानांचा सामना करत उच्च तंत्रज्ञान आणि मानवी जीवन अधिक सुंदर करण्यासाठी जपानचा प्रत्येक नागरिक योगदान देत आहे. नैसर्गिक प्रतिकूल परिस्थितीपुढे खचून न जाता पूर्ण धैर्याने जपानी नागरिक मार्ग काढतो. येथील संस्कृती, उच्च विकसित तंत्रज्ञान यावर आधारित पायाभूत सेवा, सुविधांचा अभ्यास युवा पिढीने करावा यासाठी पीसीईटी संचालित एस.बी.पाटील पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जपानला भेट द्यावी, असे मार्गदर्शन जपान येथील एससीसीआयपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रेन्या किकुची यांनी केले.

जपानी संस्कृती विषयावर संवाद, संस्कृतींची देवाणघेवाण आणि आंतरराष्ट्रीय सहयोगाचा एक भाग म्हणून किकुची यांनी एस.बी. पाटील पब्लिक स्कूल, रावेत येथे नुकतीच भेट दिली. यावेळी एलएससीएल रोबोटिक्सचे संचालक डेव्हिड प्रकाश, प्राचार्या डॉ. बिंदू सैनी, उपप्राचार्या पद्मावती बंडा, मुख्याध्यापक शुभांगी कुलकर्णी, प्रशासन व्यवस्थापक मनीष ढेकळे व विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

यावेळी इयत्ता सातवी, आठवीच्या विद्यार्थ्यांनी जापानी भाषेत पाहुण्यांचे स्वागत केले. बालगीत सादर केले. विद्यार्थ्यांनी जपानी तंत्रज्ञानातील नाविन्यपूर्ण कल्पना, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच शहर नियोजन आर्थिक स्थिरता, निवास वास्तुकला आणि दैनंदिन जीवनाविषयी रेन्या किकुची व डेव्हिड प्रकाश यांना अनेक प्रश्न विचारून माहिती जाणून घेतली.

तसेच शाळेची भविष्यातील वाटचाल, दृष्टिकोन, शिक्षण पद्धती आणि बहुभाषिक व बहुसांस्कृतिक शिक्षण याबाबत मान्यवरांनी मुख्याध्यापकांशी संवाद साधला.

स्वागत प्राचार्या डॉ. बिंदू सैनी आणि आभार मनीष ढेकळे यांनी मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# कागदविरहित सेवेसाठी विद्यापीठाकडून स्वतंत्र संकेतस्थळ विकसित

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात परीक्षा आणि मूल्यमापनविषयक सर्व सेवा आता कागदविरहित केल्या जाणार आहेत. कागदविरहित सेवेसाठी स्वतंत्र संकेतस्थळ विकसित करण्यात आले असून, विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, परिसंस्थांसाठी संकेतस्थळ २३ जूनपासून कार्यान्वित करण्यात येणार आहे.परीक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी ही माहिती दिली.

आता परीक्षा विभागाच्या छाननी आणि सारणी कक्षाचे कामकाज कागदविरहित करण्यात आले आहे. त्यासाठी grievance.unipune.ac.in हे स्वतंत्र संकेतस्थळ आणि कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

विद्यापीठातील विभाग आणि संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ट्रान्सस्क्रिप्ट, पदवी प्रमाणपत्र, गुणपत्रक अशी कागदपत्रे महत्त्वाची असतात. आतापर्यंत विद्यार्थ्यांना या प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करून त्या अर्जाची प्रत विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रात जमा करावी लागते. त्यात विद्यार्थ्यांचा वेळ जातो. त्यामुळे ही प्रक्रिया कागदविरहित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968